## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ०४/२००९/ दिनांक :

श्री. अरुण जयवंत साबळे, अर्जदार
रा. वायफळ, ता. जत, जि. सांगली

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि.वितरण कं.लि.,
संवसु मंडळ कार्यालय, विश्रामबाग , सांगली. विरूध्द पक्षकार

२) कार्यकारी अभियंता,
महावितरण, विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ,
जिल्हा सांगली.

३) सहाय्यक अभियंता,
महावितरण, उप विभाग, संख, जि. सांगली

**कोरम** :– १) श्री. के.वाय. जगताप, अध्यक्ष,
२) श्री. एस.आर. बांबळे, सदस्य–सचिव
३ श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

### न्याय निर्णय

श्री. के.वाय. जगताप, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच यांचे तर्फे दिनांक : १९.०५.२००९

सदरील प्रकरण हे अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांच्याकडील तक्रार क्र. ४१९/२००८ यामध्ये दिलेल्या निर्णयाविरुध्द दाखल करण्यात आलेले आहे. प्रकरणाचा संक्षिप्त वृत्तांत असा की, अर्जदार श्री. अरुण ज. साबळे यांनी शेतीपंपास वीज जोडणी मिळणे बाबत अर्ज केला होता. त्यामध्ये ता. ११.६.२००८ रोजी कोटेशनची रक्कम रु. ४०००/– भरण्यात आली. परंतु अर्जदाराचे म्हणणे की, कृती मानके प्रमाणे त्यांना सदरील अर्जाचे तारखेपर्यंत म्हणजे ७.१.२००९ पर्यंत वीज पुरवठा मिळाला नव्हता. या बाबत अंतर्गत कक्षाने

असा विद्युत पुरवठा देणे बाबत आदेशही केलेला होता. सबब अशा आदेशाची कार्यवाही होणेबाबत प्रकरण दाखल करण्यात आले. या प्रकरणामध्ये वि.प. यांना नोटीस काढून त्यांचे म्हणणे मागविण्यात आले.



त्याप्रमाणे ता. २.२.२००९ रोजी वि.प.तर्फे या कार्यालयास म्हणणे देण्यात आले. त्या म्हणण्याप्रमाणे अर्जदाराने ता. ११.६.२००८ रोजी अनामत रक्कम भरलेली आहे. त्यांच्या वीज जोडणी बाबत ०.१२ कि.मी. एल.टी. लाईनो काम करणे आवश्यक होते. त्याप्रमाणे २ विजेचे खांब उभे करुन जरुर त्या तारांचे जाळे ओढले. परंतु चाचणी अहवाल प्रमाणे प्रत्यक्ष जागेची पाहणी केली असतां, ग्राहकाने विद्युत संच जागेत मांडला नव्हता व मोटर बसविली नव्हती. सबब त्यांचेकडून पूर्ततेची व फेर चाचणी अहवालाची मागणी केली. त्यांनी फेर चाचणी अहवाल ता. १८.१०.२००८ रोजी दिला व मोटर बसविली आहे. पुढे ता. १८.०१.२००९ रोजी त्यांना वीज जोडणी देण्यात आलेली आहे व त्यांच्या अर्जाची पूर्तता केलेली आहे. पुढे सदरचे प्रकरण सुनावणीसाठी सांगली येथे ठेवण्यात आले. परंतु त्यावेळी अर्जदार स्वत: अथवा त्यांचे प्रतिनिधी श्री. मुल्ला हजर झाले नाहीत. वि.प.तर्फे श्री. भोसले, कार्यकारी अभियंता, कवठे महांकाळ हजर होते व त्यांनी त्यांची बाजू मंचापुढे मांडली.

या प्रकरणामध्ये अर्जदाराचे वीज जोडणीसाठी ०.१२ कि.मी. म्हणजे २ पोलची उभारणी व तारांचे जाळे टाकावयाचे असलेने कृती मानके परिशिष्ट अ मधील पुरवठ्याची कार्यवाही परिच्छेद ३ प्रमाणे ३ महिने मुदत दिलेली आहे. अर्जदाराचा फेर चाचणी अहवाल हा ता.१८.१०.२००८ रोजी दिला. सबब तदनुतर ३ महिने म्हणजे ता. १८.०१.२००९ पर्यंत वि.प.तर्फे अर्जदारास विजेची जोडणी दिलेली आहे. परिणामी, यामध्ये कोणत्याही कृती मानकाचा भंग झालेला नाही. सबब, अर्जदाराच्या अर्जातील हा मुद्दा चुकीचा व बेकायदेशीर आहे. परिणामी, अर्जदाराचा अर्ज फेटाळणे क्रमप्राप्त ठरते. सबब खालील प्रमाणे आदेश.

## आदेश

१) तक्रार अर्ज क्र. ०४/०९ फेटाळण्यात येत आहे.

२) खर्चाबाबत आदेश नाही.

३) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

( काकासाहेब य . जगताप )
अध्यक्ष,
ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर

दिनांक : १९.०५.२००९

श्री. जी.सी लेले, ग्राहक सदस्य ..

श्री. एस.आर. बांबळे, सदस्य सचिव ..